# Printing Area

www.विद्यावार्ता.कॉम®

YouTube Channel

*Vidyawarta is peer reviewed research journal. The review committee & editorial board formed/appointed by Harshwardhan Publication scrutinizes the received research papers and articles. Then the recommended papers and articles are published. The editor or publisher doesn't claim that this is UGC CARE approved journal or recommended by any university. We publish this journal for creating awareness and aptitude regarding educational research and literary criticism.*

*The Views expressed in the published articles, Research Papers etc. are their writers own. This Journal dose not take any libility regarding appoval/disapproval by any university, institute, academic body and others. The agreement of the Editor, Editorial Board or Publicaton is not necessary. Editors and publishers have the right to convert all texts published in Vidyavarta (e.g. CD / DVD / Video / Audio / Edited book / Abstract Etc. and other formats).*

***If any judicial matter occurs, the jurisdiction is limited up to Beed (Maharashtra) court only.***

Indexed

IMPACT FACTOR 7.891 iijif

Govt. of India,
Trade Marks Registry
Regd. No. 3418002

http://www.printingarea.blogspot.com

# INDEX

01) कालिदास – साहित्यागतील संगीत
डॉ.स्नेहल दत्तात्रय शेंबेकर, अकोला ||15

02) मुक्तीनंतरचे गोमंतकातील मराठी साहित्य
प्रा. डॉ. जगतवाड शिवाजी पिराजी, जाफ्राबाद ||18

03) धर्माबाद तालुक्यातील आदिवासी महिलांचे जीवन
नितीन नागनाथ मुंडलोड ||21

04) दलित साहित्य प्रवाह: एक चिंतन
डॉ. लक्ष्मण एस पवार, हिमायतनगर ||26

05) अन्न सुरक्षा विधेयका समोरिल आव्हाने : उस्मानाबाद जिल्हा विशेष अभ्यास
श्रीमती. सुवर्णा रामचंद्र शिंगे, ता.जि.उस्मानाबाद ||31

06) महानुभावपंथ उदयपूर्व समाजस्थिती
डॉ. माधुरी मनोहरराव पाटील, जिल्हा – अकोला ||37

07) राष्ट्रीय सेवा योजना : ही एक एक युवा चळवळ
डॉ. रमेश रामराव बैनवाड, जि. परभणी, महाराष्ट्र ||40

08) संघर्षशील विचारांची कृतीशील नांदी म्हणजे आम्ही लढलो – आम्ही घडलो
प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे, गढी ||44

09) भारतेन्दु हरिश्चंद्र के नाटकों में सामाजिक स्थिति एवं प्रभाव (भारत दुर्दशा, अंधेर ...
डॉ. आंचल श्रीवास्तव & चुड़ामणी पटेल, बिलासपुर(छ.ग.) ||47

10) भविष्यदृष्टा श्री गुरू गोबिंदसिंघ जी
कामठेकर अनिता & कौर स. प्रितमसिंघ, जिल्हा– बुलढाणा ||50

11) प्रतीक मिश्र के साहित्य में युगबोध की अभिव्यक्ति
डॉ.अनुपमा चतुर्वेदी & रामनाथ मिश्र, फिरोजाबाद ||52

12) असग़र वजाहत के नाटको में चित्रित संवेदना
असद खान, औरंगाबाद ||55

४) प्रस्तुत संशोधन पेपर मध्ये ऑनलाइन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे संदर्भ घेण्यात आला आहे .

५) अशोक कुमार, राजनीति विज्ञान . उपकार प्रकाशन आग्रा 2008.

६) भारतीय राजकीय विचारवंत.

७) चालू घडामोडी वर प्रकाश टाकणारे नियतकालिके, वर्तमानपत्रे मासिके इत्यादींचा वापर करण्यात आला आहे.

□□□

Assistant ... JBSPM's Arts & Sci. College Gadhi Tq. Georai Dist. Beed

08

# संघर्षशील विचारांची कृतीशील नांदी म्हणजे आम्ही लढलो – आम्ही घडलो

प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे
कला व विज्ञान महाविद्यालय, शिवाजीनगर, गढी

डॉ. मारोती तेगमपुरे व डॉ. अतुल चौरपगार यांनी संपादित केलेले आम्ही लढलो – आम्ही घडलो हे पुस्तक नुकतेच प्रकाशित झाले. न्यायासाठी, हक्कासाठी, नव्या समाजाच्या निर्मितीसाठी संघर्षशील वैचारिक भूमिका घेऊन वाटचाल करणाऱ्या नव्या शिलेदारांचा आणि वारसा जगणाऱ्या कार्यकर्त्यांच्या भावावस्था टिपणारा हा ग्रंथ, पुढील काळाच्या वाटचालीसाठी दिशादर्शक असा आहे. स्वातंत्र्य, लोकशाही, समाजवाद यांनी मांडणी करत असताना केलेल्या विधायक कामाचा हा अनुभवाधारीत दस्तऐवज आहे. ध्येयनिष्ठा पेरीत गेलेल्या संघटनेची नोंद आणि ध्येयनिष्ठ कार्यकर्त्यांने संघर्षमय जीवन, अनुभव मांडण्याचा हा प्रयत्न आहे. ही संपादकाची सहज आणि साधी भूमिका घेऊनच या पुस्तक रूपाने घडण्याची प्रक्रिया शब्दबद्ध झाली आहे. ही यातली जमेची बाजू आहे. प्रत्येक पाना पानावरल्या आंदोलन, लढ्यात आजपर्यंतचा विद्यार्थी म्हणून माझा कुठे ना कुठे, काही ना काही सहभाग होताच, अशी अनुभूती प्रत्येक वाचकाला येईल इतके या संघटनेचे सर्वसमावेशक, व्यापक रूप आहे, तेही या पुस्तकामुळे डोळ्यासमोर उभे रहायला लागते.

नुसत्या जगण्याचे कसब महत्त्वाचे नाही तर मानवी कल्याणाचा शुध्द पद्धतीने विचार करू शकलो असतो का? या संपादकाच्या आणि आपल्या सर्वांच्याच प्रश्नाचे उत्तर म्हणजे आम्ही लढलो — आम्ही घडलो.

शिक्षण घेता घेताच संघटन आणि संघर्ष या आघाड्यांवरही गेल्या पन्नास वर्षापासून अविरत अग्रेसर असणारे एकमेव विद्यार्थी संघटन म्हणजे स्टुडंटस फेडरेशन ऑफ इंडिया (SFI) होय.

विद्यापीठीय शिक्षण घेत असतानाच्या कालावधीत या संघटनेशी ज्यांचा ज्यांचा जो काही संबंध आला, त्याची कारणे, फायदे वेगवेगळी आहेत. आपल्या गावाकडील मित्र, नवख्या शहारात मिळालेला विश्वासू आधार आणि महत्वाचे म्हणजे हालाखीच्या परिस्थितीत उघडे पडण्याची वेळ या समुहात वावरताना कधीच आली नाही. अशा वातावरणात यातल्या जवळपास सर्वांसोबत राहण्याचा, काही ना काही काम करण्याचा प्रसंग प्रस्तुत लेखकाला आला आहे. म्हणूनही यातल्या प्रत्येक लेखाची उंची वाढत जाते. प्राचार्य डॉ. विठ्ठल मोरे, कॉ. उद्धव भवलकर म्हणाले त्याप्रमाणे जगण्याचे वास्तव समोर यावे, जे काही विसरलेपण आहे ते भानावर यावे असे वाटणाऱ्या मैत्रीच्या गावाचे हे शब्दांकन आहे. स्वत:ला घडवण्याच्या कालावधीत आजुबाजूचे वातावरण, संघटना काही एक परिणाम करत असतात. एकूणच आयुष्यातील घडामोडीचा हा आलेख आहे असे डॉ. डी. एल. कराड म्हणतात. या चळवळीत वावरणाऱ्या प्रत्येकाची कृतार्थ भावना ग्रंथातील शब्दाशब्दांतून जाणवत राहते.

सामाजिक, राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक पातळ्यावरचे डोळस आकलन विद्यार्थी जीवनात होणे गरजेचे आहे. तेव्हाच आपली समज आणि उमज हितकारक असेल. आणि एसएफआय सारखी संघटना हेच ध्येय घेऊन वाटचाल करते आहे. काही काळ या संघटनेशी जोडून घेता आले. ही माझ्यासाठी मोठी उपलब्धी आहे. मला जी काही दृष्टी आणि दृष्टिकोन मिळाला तो या संघटना व या मित्र परिवारामुळेच. म्हणूनच तडजोडी करत करत जीवनाला ओरबाडत जगण्यापेक्षा, लढत लढत घडण्याचा हा पुस्तक रूपी प्रवास अनेकांना प्रेरित करणारा आहे असे मला वाटते. कॉ. गंगाधर अप्पा बुरांडे यांच्या विषयीची कृतज्ञताही अनेकांच्या लेखनातून पदोपदी जाणवत राहते. मराठवाड्यातील या चळवळीला सक्षम, सकस करण्यात अप्पांचे जे योगदान आहे, तेही या निमित्ताने अधोरेखीत झाल्याचे दिसते.

कॉ. अण्णा सावंत, अर्जुन आडे, राजनांद सुरडकर इत्यादींचे अनुभवात्मक चिंतन प्रेरणादायी असून, सांस्कृतिक संघर्षाशी नाळ जोडत चालले पाहिजे, वैचारिक नेतृत्व करणारा बुद्धीजीवी वर्ग तयार व्हावा, लोकांमध्ये राहून काम करायचे, तर त्या लढ्यावर व कार्यकर्त्यांवर विश्वास असावा अशा प्रकारची निष्ठा व्यक्त करणारा हा प्रवास आहे. एसएफआय ही एक जाणिवांचे क्षेत्र विस्तारण्याची पायरी आहे व माझ्या जगण्याला व्यापक, विशाल करणारा पट आहे. असा विचार पेरणाऱ्यांचा हे पुस्तक मौलिक ठेवा आहे. तो संपादकांनी सर्वांसाठी खुला केला हे अभिनंदनीय असेच आहे. डॉ. उमाकांत राठोड यांच्या सारखी धडाडीने माणसेही यातून तयार झाली. त्यांच्या बेफिकीरीला जबाबदार समाजशील बनवणारे, विचार करण्याच्या पद्धतीत बदल करणारे मशीन म्हणजे

एस. एफ. आय. हे त्यांनीच सांगितले आहे. लढाईचा हेतू साधायचा असेल तर मार्ग शुद्ध हवा असे ठामपणे सांगणारे डॉ. मारोती तेगमपुरे ही याच मार्गाचे प्रवासी आहेत. त्यांनी आपल्या लेखात एस एफ आय ही जीवनदृष्टी देणारी संस्था आहे असे मत नोंदवले असून ते अनेकार्थाने खरे आहे. कार्यकर्त्यांना मित्रत्वाची जाणीव करून देत डॉ दत्ता रणखांब सारखे लोकहितदक्ष तरूण सामुहीकरित्या कार्य करताना अनेकांना ह्या चळवळीत सामील करत जातात. हे सर्व ते अत्यंत साधेपणाने, कसलाही अविर्भाव न बाळगता सातत्याने करीत आहेत. अशा अनेक प्रकारच्या अवलियांचा हा विद्यार्थी दशेतला लढण्याचा आणि घडण्याचा शब्दमेळा आहे. तो या चळवळीला मजबूत करतो यात शंका नाही.

तत्त्वांच्या, विचारांच्या बैठकीला कर्तृत्व आणि कुशलतेची जोड देण्याचा प्रयत्नही हे पुस्तक करेलच अशी आशा वाटते. पण विद्यार्थी जीवनात, समाजकारणात अनेक प्रश्न, अनेक समस्येला वाचा फोडण्यात अथवा जनहितांच्या कार्यात नेहमीच अग्रेसर असणाऱ्या या संघटनेला; पक्षाला मात्र जनमत मिळवण्यात पाहिजे तेवढे यश आले नाही हे खेदाने म्हणावे लागते. ही कोंडी फोडून आरपारच्या लढल्या जाणाऱ्या लढाईला, राजकारणातल्या सत्तेची, विजयाची साथ मिळावी आणि त्याची पायाभरणी या सगळ्यांच्या कार्यातून व्हावी. त्यामाध्यमातून नव्याने या क्षेत्राकडे येणाऱ्यासाठी सकारात्मक विचाराबरोबरच कृतीशील नांदी प्रस्तुत ग्रंथरूपाने ठरावी ही माफक अपेक्षा असून या ग्रंथाची निर्मिती करणारे डॉ. मारोती तेगमपूरे व डॉ. अतुल चौरपगार यांच्या ध्येयवादी कार्याला सलाम. चळवळीत काम करू इच्छिणाऱ्या तरुण विध्यार्थी मित्रांनी हा ग्रंथ आवर्जून वाचला पाहिजे. शब्दवेध प्रकाशन, औरंगाबाद यांनी प्रकाशित केलेला हा ग्रंथ २१६ पृष्ठसंख्येचा असुन प्रसिध्द चित्रकार राजानंद सुरडकर यांचे ग्रंथास आशयघन मुखपृष्ठ आहे. ग्रंथ म्हणून बांधणी अतिशय उत्तम झाली असून, चळवळी कशा उभ्या कराव्यात याविषयीची शिकवण देणारा हा ग्रंथ म्हणजे विचारानुभवाचे एक शास्त्र आहे.

संदर्भ —

आम्ही लढलो — आम्ही घडलो —डॉ. मारोती तेगमपुरे व डॉ. अतुल चोरपगार

□□□

Assistant Professor
JESPM's Arts & Sci. College,
Gadhi Tq. Georai Dist. Beed